Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-6(A) June-2026

Original Article

# मराठी साहित्य व संस्कृतीवर प्रसार माध्यमांचा प्रभाव

**प्रा. डॉ. श्रीपती म. रायमाने**
मराठी विभाग प्रमुख, के. एल. ई. संस्थेचे जीआय बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी
Email: drsmrayamane@hmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180605
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 6(A)
Pp 12-14
June - 2026
**Submitted:** 10 May 2026
**Revised:** 20 May 2026
**Accepted:** 10 June 2026
**Published:** 30 June 2026

***प्रस्तावना :***

*लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणजे प्रसार माध्यमे ज्याला समाजाचे पालक मानले जाते ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ "मॅक आयव्हर" आणि "पेज" यांनी समाजाची व्याख्या करताना सांगितले की," समाज हे सामाजिक संबंधाचे जाळे आहे आणि प्रसारमाध्यमे या सामाजिक संबंधांना समाजाबरोबर मांडतात". याद्वारे समाज आपली सकारात्मक आणि नकारात्मक मांडणी स्पष्ट आरसा पाहून त्यांची विविध रूपे समजून घेऊ शकतो सोशल मीडियाचा समाजावर होणारा सकारात्मक परिणामावर चर्चा करतात. सोशल मीडियाच्या द्वारे जनसामान्य योग्य लोकशाहीकरण माध्यमातूनच खेळू शकते प्रत्येक समाजाची संस्कृती खोलवर रुजलेली असतात त्या त्या समूहांचा जीवन सरनेनुसार त्या समूहाचे संस्कृती आकाराला येत असते. त्यामुळे प्रत्येक समूहाचे कला, साहित्य, परंपरा, समजूती, धारणा, श्रद्धा, नैपुण्य, क्षमता, रुढी, गरजा, नैतिक संकल्पना जीवनात जीवन पद्धती अशा अनेक गोष्टी मधून प्रत्ययाला येते .लोक साहित्यामध्ये जगभराच्या आदी मानव जीवनाचे दर्शन घडते. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क या कलम 29 मध्ये असे सांगितले आहे की "भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्यांच्या कोणत्याही भाग राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक गटाला आपली स्वतःची वेगळी भाषा लिपी व संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा हक्क असे" .कोणतीही जिवंत संस्कृती ही परिवर्तनशील असते. आणि परंपरेच्या आवरणाखाली ती आतून बदलत असते प्रसार माध्यमाचे माहिती आणि मनोरंजनाचा प्रसार जनजागृती, शिक्षण, सामाजिक संबंध, सुधारणे,लोकशाही आणि जागतिक बदलण्यासाठी प्रोत्साहन देणे तसेच कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देणे होय.*

***मुख्यशब्द:*** *भारतीय प्रसारमाध्यमे खूप विस्तृत आणि वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण आहेत प्रसार माध्यमांचा अभ्यास करणे किंवा त्याबद्दल माहिती मिळवणे यामध्ये वर्तमानपत्रे, मासिके, रेडिओ, दूरदर्शन, इंटरनेट आणि इतर माध्यमांचा समावेश होतो.*

**सविस्तर-**

भारतामध्ये "प्रसारमाध्यम" याची सुरुवात मुख्य रूपाने ब्रिटिश शासन यांच्या काळात 1927 मध्ये झाली. मुंबई आणि कोलकत्ता मध्ये निधी ट्रान्समीटर सोबत रेडिओ प्रसार माध्यम सुरू झाले ज्याला आकाशवाणी (ऑल इंडिया रेडिओ) च्या रूपाने आज प्रसारित आहे. यामध्ये टेलिव्हिजन प्रसार 1959 मध्ये तर प्रिंट मीडियाची सुरुवात 1780 मध्ये झाली .1990 मध्ये इंटरनेटचा आगमन भारतात झाले. भारतामध्ये 121 भाषा दहा हजार हून जास्त लोक बोलतात त्यामध्ये 19500 घ्या मातृभाषा आहेत. भारतीय संविधान भाग ८ मध्ये २२भाषांचा समावेश केला आहे मानव जातीच्या आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वात मोठा क्रांती इंटरनेट आणि सोशल मीडिया क्रांती आहे संपूर्ण जगाला जवळ आणले आहे आज अनेक व्यवसाय ऑफलाईन जगातून ऑनलाइन सोशल मीडिया वर आलेले आहेत आजच्या युगात सोशल मीडिया जगातील सर्वात जलद संप्रेषणाचे साधन बनले आहे त्यामुळे जीवन खूप सोपे झाले आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. श्रीपती म. रायमाने मराठी विभाग प्रमुख, के.एल.ई. संस्थेचे जीआय बागेवाडी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, निपाणी*

**How to cite this article:**
*रायमाने, श्रीपती. म. (2026). मराठी साहित्य व संस्कृतीवर प्रसार माध्यमांचा प्रभाव. Journal of Research & Development, 18(6(A)), 12–14. https://doi.org/10.5281/zenodo.21488053*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21488053
OPEN ACCESS

त्यामध्ये भारतीय संस्कृती ही जगातील सर्वात प्राचीन आणि समृद्ध संस्कृती पैकी एक आहे. तिचे काही प्रमुख गुण सुद्धा आहेत." संस्कृती" हा शब्द 'प्रकृती'आणि विकृती या शब्दांची संबंधित आहे. प्रकृती म्हणजे निसर्ग तर "विकृती" म्हणजे निसर्गात होणारा बदल संस्कृती म्हणजे या विकृतीला रोखण्यासाठी आणि प्रकृतीला उन्नत करण्यासाठी केलेले प्रयत्न किंवा संस्कार.भारतीय संस्कृतीमध्ये वेगवेगळया प्रादेशिक, भाषिक आणि धार्मिक लोकांचे मिश्रण आहे .तरीही,ही एकता आणि एकात्मतेच्या भावनेवर जोर देते अध्यात्माला आणि आंतरिक शांतीला महत्त्व दिले जाते कला साहित्य संगीत आणि नृत्य यासारख्या क्षेत्रात खूप मोठी प्रगती केली आहे प्रसारमाध्यमे वृत्तपत्रे ,मासिके, दूरदर्शन, रेडिओ ,इंटरनेट ,आणि चित्रपट यासारख्या विविध माध्यमांचा समावेश होतो, ही प्रसार माध्यमे माहिती आणि मनोरंजन या दोन्ही प्रकारे समाजावर परिणाम करतात आणि समाजाच्या प्रतिमांना आकार देतात माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचा आकडेवारीनुसार भारतात 1.55 लाख होऊन अधिक प्रकाशने आणि 108 खाजगी टीव्ही चॅनेल आहे . यामुळे लोकांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन वाढतो आणि समाजाची प्रगती होते प्रसारमाध्यमे जगातील ताज्या बातम्या विविध विषयांची माहिती आणि मनोरंजन कार्यक्रम लोकापर्यंत पोहोचवितात शिक्षण आणि प्रसार करण्यास माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात ज्यामुळे लोकांना नवीन गोष्टी शिकायला मिळतात सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे काम माध्यमिक असतात लोकांना विविध विषयांवर विचार करण्यास आणि सामाजिक बदलासाठी एकत्र येण्यास प्रोत्साहित करतात विविध कला संस्कृती आणि परंपरा बद्दल माहिती देतात ज्यामुळे त्यांची जपणूक होते चित्रपट संगीत खेळ अशा अनेक माध्यमांद्वारे लोकांना मनोरंजन मिळते ते त्यांच्या मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे असते.

प्रसारमाध्यमे आणि विद्यार्थी आजच्या डिजिटल युगात प्रसार माध्यमांचा ( म्हणजे वृत्तपत्र ,टीव्ही, रेडिओ ,सोशल मीडिया, इंटरनेट , समाजावर आणि विशेषतः विद्यार्थ्यांवर मोठा प्रभाव पडतो माहितीचा प्रसारासाठी ही माध्यमे अत्यंत प्रभावी साधने. ज्ञानवृद्धी उत्तपत्रे शैक्षणिक टीव्ही कार्यक्रम आणि शैक्षणिक वेबसाईटमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाव्यतिरिक्त अधिक जास्त माहिती मिळते विदेशातील चालू घडामोडीची माहिती मिळाल्यामुळे विद्यार्थी अपडेट राहतात स्पर्धा परीक्षा देणे यासाठी ही खूप महत्त्वाचे आहे . भाषा कौशल्य वाचनाच्या सवयीमुळे भाषा सुधारते शब्द संपत्ती वाढते करिअर मार्गदर्शन कार्यक्रम मुलाखती यशोगाथा यामधून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते प्रसारमाध्यमांचा उपयोग माहिती मिळवण्यासाठी करा. गैरवापर मीडियाचा अतिवापर केल्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ शकते अपुरी किंवा चुकीची माहिती किंवा अफवा प्रसारित होतात यांचा विद्यार्थ्यावर वाईट परिणाम होऊ शकतो मानव हिंसात्मक नकारात्मक किंवा अश्लील सामग्री विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य बिघडू शकते प्रसार माध्यमे ही एक शक्तिशाली साधन आहेत विद्यार्थ्यांनी त्याचा योग्य वापर केल्यास ती माहिती मिळवण्याचे, विचार करायला शिकण्याचे आणि व्यक्तिमत्व घडण्याचे माध्यम ठरू शकते मात्र अति किंवा चुकीचा वापर टाळणे गरजेचे आहे .

प्रसार माध्यमाची भूमिका माहिती देणे शिक्षण देणे आणि मनोरंजन करणे ही प्रसार माध्यमाची मुख्य भूमिका आहे लोकांना जागरूक करणे सामाजिक समस्यावर प्रकाश टाकणे आणि सार्वजनिक चर्चांना प्रोत्साहन देणे हे देखील प्रसार माध्यमाचे कार्य आहे माध्यमांचा समाजावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे त्यांनी समाजासाठी सकारात्मक आणि जबाबदार भूमिका बजावणे आवश्यक आहे भारतातील प्रसारमाध्यमे विविध कंपन्या व्यक्ती आणि सरकारी संस्थांच्या मालिकेची आहे काही माध्यमे मोठ्या व्यवसायिक घराण्याच्या मालिकेची आहेत तरी काही माध्यमे सरकारी मालकीची आहे जसे की ,डीडी न्यूज आणि आकाशवाणी प्रसार माध्यमांमध्ये मुखत्वे मुद्रित माध्यमे (वर्तमानपत्रे ,मासिके) श्राव्य माध्यमे (रेडिओ) , श्राव्य-दृक श्राव्य माध्यमे (दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट, सोशल मीडिया ) याचा समावेश होतो ही माध्यमे माहिती, शिक्षण आणि मनोरंजनासाठी वापरली जातात.

**निष्कर्ष**

सध्या स्थिती 1950 च्या दशकापासून भारतातील माध्यम क्षेत्र एक फायदेशीर व्यवसाय बनले आहे, ज्यामुळे जाहिरातीमध्ये वाढ झाली आहे आणि माध्यमाचे व्यापारीकरण झाले आहे सध्या भारतात माध्यमांचा एक मोठा आणि सक्रिय परिसंस्था आहे. जात खाजगी आणि सरकारी दोन्ही प्रकारचे माध्यम क्षेत्र समाविष्ट आहे भारत हा संस्कृतीचा समृद्ध देश आहे जिथे लोक त्यांच्या संस्कृतीत राहतात प्रसारमाध्यम हे असे साधन आहे जेथे पृथ्वीपासून ते चंद्रापर्यंत संदेश पोहोचवण्याचे काम प्रसारमाध्यम करत आहे विदेशी पर्यटनांचा इंटरनेटचा सहाय्याने व माध्यमाच्या मुळे भारतीय संस्कृती जाणून घेण्याचा प्रयत्न करतात.

**संदर्भ ग्रंथ:**

1) मोहन आपटे, संगणक, इंटरनेट, यंत्रमानव भविष्यवेध, राजहंस प्रकाशन, पुणे. 2001

2) श्री. के. क्षीरसागर, मराठी भाषा वाढ आणि बिघाड, मराठी राज्य विकास संस्था.

3) डॉ .पांडुरंग गायकवाड - जनसंंचार माध्यमांचा सांस्कृतिक परिणाम. पृष्ठ क्र.17

4) डॉ .माधव पाटील - प्रसार माध्यमे संकल्पना आणि वात्सव. पृष्ठ क्र. 36

5) डॉ. रा. भा. पाटणकर - प्रसार माध्यमे आणि समाज. पृष्ठ क्र.99

6) काका जोशी - आधुनिक माध्यमे आणि साहित्य. पृष्ठ क्र.84